




दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार १३ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३६२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये







# बांगलादेशाच्या गृहमंत्र्यांनी हात जोडून मागितली हिंदू समाजाची माफी !

काही दिवसांपासून आरक्षणाच्या मुद्यावरुन बांगलादेशात असंतोष पसरला होता. शेख हसीना यांच्या सरकारविरोधात जनतेनं उठाव केला होता. यानंतर परिस्थिती इतकी चिघळली की, शेख हसीना यांना राजीनामा देऊन देश सोडावा लागला. शेख हसीना सध्या भारतात आश्रयाला आल्या आहेत. या घटनेनंतर आता बांगलादेशात अंतरिम सरकार स्थापन झाले आहे. असं असलं तरी येथील परिस्थिती अद्याप नियंत्रणाबाहेर आहे. जमावाकडून देशात अनेक हिंदू समुदायावर हल्ले करण्यात आले. अनेक हिंदू मंदिरे, घरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांची तोडफोड करण्यात आली. याबाबत आता बांगलादेशचे नवे गृह सल्लागार (गृहमंत्री) सखावत हुसेन यांनी रविवारी हिंदू समुदायाचे पुरेसे संरक्षण न केल्याबद्दल त्यांची माफी मागितली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हिंदू अल्पसंख्याकांचं संरक्षण करणं हे मुस्लिम बहुसंख्यांचे कर्तव्य आहे, असं सखावत हुसेन म्हणाले. तसंच, या जबाबदारीत त्यांनी अपयशाची कबुली दिली. त्यांनी भविष्यात समुदायाला सुरक्षिततेचं आश्वासन दिले आणि सुधारणेची आशा व्यक्त केली. याशिवाय, गुरुवारी रात्री सदस्यांच्या शपथविधीनंतर



अंतरिम सरकारच्या मंत्रिमंडळानं रविवारी अल्पसंख्याकांवरील हिंसाचारावर पहिली प्रतिक्रिया दिली. काही ठिकाणी धार्मिक अल्पसंख्याकांवर होणाऱ्या हल्ल्यांकडे गंभीर चिंतेनं पाहिलं जात आहे," असं मंत्रिमंडळानं निवेदनात म्हटलं आहे. तसंच, मंत्रिमंडळानं असं म्हटलं आहे की, अशा प्रकारच्या घृणास्पद हल्ल्यांचे निराकरण करण्याचे मार्ग शोधण्यासाठी ताबडतोब प्रतिनिधी संस्था आणि इतर संबंधित गटांसोबत बैठक घेतली जाईल. पीटीआयच्या म्हणण्यानुसार, शेख हसीना यांनी गेल्या सोमवारी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर बांगलादेशी हिंदूंना हिंसाचार आणि लूटमारीचा सामना करावा लागत आहे. अनेक हिंदू मंदिरे, घरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांची तोडफोड करण्यात आली आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाशी संबंधित किमान दोन हिंदू नेते या हिंसाचारात ठार झाले आहेत. हिंदू समाजाची निदर्शने दरम्यान, बांगलादेशची राजधानी ढाका आणि ईशान्येकडील बंदर शहर चितगाव येथे अल्पसंख्याक हिंदू समाजाच्या हजारो लोकांनी प्रचंड निदर्शने केली. देशभरातील मंदिरे, त्यांची घरे आणि व्यवसायांवर हल्ले होत असताना त्यांनी सुरक्षेची मागणी केली. अल्पसंख्याकांवर अत्याचार करणाऱ्यांवर खटला चालवण्यासाठी विशेष न्यायाधिकरण स्थापन करावे, अल्पसंख्याकांसाठी १० टक्के संसदीय जागा, अल्पसंख्याक संरक्षण कायद्याची अंमलबजावणी आदी मागण्यांसाठी आंदोलन करणारे हिंदू समाजाचे लोक होते.



## बीड कृषी उतपन्न बाजार समितीच्या सचिवपदी यशवंत कदम यांची निवड

**बीड प्रतिनिधी**

बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीच्या सचिवपदी यशंवत कदम साहेब यांची नियुक्ती करण्यात आली यावेळी कृषी उत्तपन्न बाजार समितीच्या कर्तव्यदक्ष सभापती सौ.सरलाताई कामराज मुळे पाटील,उपसभापती शामसुदंर पडुळे,संचालक शरद झोडगे,संचालक पेठणे उध्दव मनोहर,संचालक माने संजय मारोती,संचालक लांडे आदिनाथ बाबासाहेब,संचालक चव्हाण बळीराम बापुराव,संचालक जोगदंड प्रभाकर यादवराव ,संचालक सौ.काळकुटे ज्ञानेश्वरी सचिन,संचालक माने सुभद्रा सखाराम,संचालक फड नितीन शिवाजी,संचालक विश्वास आखाडे,संचालक धनंजय गुंदेकर,संचालक दिपक काळे,संचालक गणेश उगले,संचालक अरूण गोरे,संचालक राधेश्याम कासट,संचालक हनुमंत जगताप यांच्यासह बीड कृषी उतपन्न बाजार समितीचे सर्व कर्मचारी अधिकारी मोठया संख्येने उपस्थीत होते यानिवडीबद्दल बीड विधानसभेचे लोकप्रिय आमदार संदीप(भैय्या) क्षीरसागर,मा.आ.अमरसिंह पंडित, शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतीताई मेटे,भाजपा जिल्हाप्रमुख राजेद्रं मस्के, शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल(दादा) जगताप,लोकनेते डॉ.बाबुराव जोगदंड यांनी शुभेच्छा देवुन अभिनंदन केले.

# तलावासाठी उपोषण,राजश्री राठोडची प्रकृती खालावली

### उपोषणकर्त्या राजश्री राठोड यांची भेट घेऊन रमेश तात्या गालफाडे यांनी केली चर्चा.

**केज । शेख सज्जाद**

तालुक्यातील कोरडेवाडी येथील साठवण तलावाला मंजुरी द्यावी,या मागणीसाठी धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्री राठोड यांचे ४ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू असून त्यांची प्रकृती खालावत चालली आहे. दरम्यान,बहुजन विकास परिषदचे संस्थापक अध्यक्ष तथा केज मतदारसंघाचे जेष्ठ नेते रमेश तात्या गालफाडे यांनी उपोषणस्थळी भेट



देत संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनी द्वारे चर्चा केली.मात्र तलावाच्या मंजुरीचे पत्र मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही,असा ठाम इशारा राठोड यांनी दिला आहे.कोरडेवाडी साठवण तलावाचा सर्वे करून २५ वर्षे लोटले तरी आणखी मंजुरी नाही. ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करूनही साठवण प्रश्न सुटत नसल्याने सरपंच नंदूबाई कोरडे व गावकऱ्यांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता.त्यानंतर आम आदमी पार्टीचे सतीश दुनघव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले होते.प्रश्न न सुटल्यास आगामी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे.

## शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालयात नशा मुक्त अभियान

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे नशा मुक्त भारत अभियानांतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्री.तत्त्वशील कांबळे यांच्या माध्यमातून, बीड जिल्हा परिषद समाज कल्याण चे अधिकारी श्री शिंदे साहेब यांनी शाळेला भेट दिली, तसेच संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष श्री डॉ.दत्ताजी नलावडे सर, यांनी नशा मुक्त भारत अभियांतर्गत कार्यक्रमांमध्ये, संस्कृती विद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना नशा मुक्तीची शपथ दिली. तसेच श्री डॉ.दत्ताजी नलावडे सर यांनी समाज कल्याण अधिकारी श्री. शिंदे साहेब यांना सर्व परिसर दाखवला, तसेच शाळेतील विविध उपक्रम त्यामध्ये पंचसूत्रे ,सप्तपदी तसेच विद्यार्थ्यांना शिकवण्यात आलेले, नवरस आणि सप्तरंग याबद्दल ही माहिती दिली यावरती अभिप्राय म्हणून श्री शिंदे साहेब यांनी शाळेचे खूप कौतुक केले व तुमची शाळा एक दिवस नक्कीच विशेष प्राविण्य मिळवेळ अशा शुभेच्छा दिल्या.



# आष्टी पाटोदा शिरूर कासार विधानसभेची जागा काँग्रेस पक्षाने लढवावी भास्कर केदार यांची काँग्रेस पक्ष श्रेष्ठींकडे मागणी

**शिरूर कासार।प्रतिनिधी**

अवघ्या दोन महिन्यावर विधानसभेच्या निवडणुका येऊन ठेपलेल्या आहेत त्या पार्श्वभूमीवर लातूर येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या वतीने आढावा बैठक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथलाजी प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले , विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात , विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार , विधान परिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील , आ.अमित विलासराव देशमुख ,आ.धीरज विलासराव देशमुख ,आदी वरिष्ठ नेत्यांकडे यांच्या उपस्थितीत आणि खा. रजनिताई पाटील . माजी मंत्री अशोकराव दादा पाटील बीड जिल्हा अध्यक्ष राजेसाहेब देशमुख जिल्हा उपाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाल काँग्रेस पक्षाने आष्टी पाटोदा शिरूर कासार या विधानसभा मतदारसंघाची जागा लढवावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्याकडे काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा सरचिटणीस भास्कर केदार यांनी केली यावेळी उपस्थित जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष जिल्हा काँग्रेस कमिटीचे सर्व पदाधिकारी क्रिएंटल सेलचे सर्व जिल्हाध्यक्ष त्यांची सर्व तालुका अध्यक्ष उपस्थित होते त्याप्रसंगी



पक्षाचे प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुका जिंकण्यासाठी पूर्ण ताकतीने कामाला लागण्याचे आवाहन केले आहे त्याप्रसंगी उपस्थिती होते

# विचारवंतांची जयंती वैचारिक पद्धतीने साजरी करणार-कॉ. नागरगोजे

**पाटोदा।प्रतिनिधी**

ज्यांनी आपले पुर्ण आयुष्य शोषित,पिडीत शेतकऱ्यांसाठी अर्पित केले अश्या थोर विचारवंतांची जयंती आपण दारू पिऊन डिजेच्या तालावर उड्या मारून साजरी करीत असाल तर त्या थोर विचारवंतांना घोर अपमान असून त्याना कसे वाटत असेल याचं नवतरूणांनी भान ठेवले पाहिजे. असे प्रतिपादन कॉमेडी महादेव नागरगोजे यांनी व्यक्त केले लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी पुर्ण आयुष्य अन्याया विरोधात आपल्या साहित्याच्या माध्यमातून लढा उभा केला व तो यशस्वी केला तर खा.कॉ.क्रांतीसिंह नानापाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू घेत त्यांना सर्वात पहिली कर्जमाफी मिळवून दिली अश्या महापुरुषांच्या जयंती त्यांच्या विचारांची पेरणी करणारे कार्यक्रम






आयोजित करणारे असावे मात्र सध्याची परिस्थिती पाहता मन व्यतित होत आहे. त्यांच्या विचारांची शिदोरी घेऊन आम्ही कार्यरत राहणार असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे आयोजक कॉ.महादेव नागरगोजे यांनी केले. कॉ.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व बीड जिल्ह्याचे मा.खा.कॉ.क्रांतीसिंह नानापाटील यांची संयुक्त जयंती दि.११ ऑगस्ट रविवार रोजी रेणुका माता मंदिरच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती.या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून अखिल भारतीय किसान सभाचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉ.राजन क्षिरसागर,भारतीय कम्युनिस्ट पक्ष सचिव मंडळ सदस्य कॉ.नामदेव चव्हाण, भारतीय शेतकरी कामगार पक्ष युवा नेते भाई मोहन गुंड,प्रा.तांदळे यांची होती.यावेळी विविध शाळेत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व कॉ.क्रांतीसिंह नानापाटील यांच्या कार्यावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्यामध्ये प्रत्येकी शाळेतून प्रथम,द्वितीय,त्वितीय स्पर्धक निवडण्यात आले होते.त्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रोत्साहनपर रोख बक्षीस वितरण करण्यात आले.यावेळी कॉ.राजन क्षिरसागर यांनी कॉ.क्रांतीसिंह नानापाटील यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या पाटोदा शहरात स्मारक मंजूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले तर शेतकऱ्यांवर केंद्र व राज्य सरकार कसे अन्याय करत आहे. यावर भाष्य केले. तसेच भाई मोहन गुंड,प्रा.तांदळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत महापुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे पुस्तके मोफत उपलब्ध करून देणार असल्याचे जाहीर केले.यावेळी व्यासपीठावर प्रा. सुशिलाताई मोरोळे,युवा नेते गणेश कवडे,जेष्ठ समाजसेवक एकबाल पेंटर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन कु.सुरेखाताई खेडकर यांनी केले तर शेकाचे बीड जिल्हा सरचिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले..

# सैनीकहो तुमच्यासाठी कार्यक्रमाच्या निमीत्ताने तहसीलदार सचीन देशपांडे यांनी केला माजी सैनीकांचा सत्कार

**केज।सचिन भालेराव**

शनिवार दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी दहा वाजता तहसील कार्यालयात सैनिक हो तुमच्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार सचीन देशपांडे यांनी या कार्यक्रमात संघर्ष माजी सैनीक संघटनेचे अध्यक्ष शेख अजिमोद्दीन मेजर व उपाध्यक्ष राम मेजर राऊत आणि संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य गण यांचा सत्कारकेला. यावेळी माजी सैनीक उपस्थित होते. सर्व माजी सैनिकांना गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले आणि माजी सैनीकांच्या समस्या जाणून घेण्याचा व त्यावर उपाय योजना करण्यात येतील असे आश्वासन दिले.संघटनेचे




उपाध्यक्ष राम मेजर राऊत यांनी माजी सैनीकांच्या व्यक्तीगत काही समस्या त्यांच्यासमोर माडल्या त्या समस्येचे निराकरण तहसीलदार सचीन देशपांडे यांनी केले.राम राऊत मेजर यांनी सामुहिक अडचणी मांडताना सैनिकांना महाराष्ट्र शासनाच्या सवलतीमध्ये त्यांना त्यांचा लाभ द्यावा अशी मागणी केली उदा.विंधन विहिरी, घरकुल,रेशन मालाचा पुरवठा या सुविधा मध्ये माजी सैनिकांना देखील त्याचा लाभ द्यावा कारण देश सेवा करून वापस आल्यास प्रत्येकाला रोजगार उपलब्ध नाही त्यामुळे शेती व शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी या योजनाचा त्यांना फायदा होईल असे सांगितले. तसेच पुढे राम राऊत मेजर यांनी तहसीलदार यांना विनंती केली की, तालुका पातळीवर असलेल्या सरकारी कार्यालयामध्ये माजी सैनीकास सन्मानपुर्वक वागणुक द्यावी व अशा आशयाचा फलक त्या कार्यालयासमोर लावावा अशी मागणी केली आहे. माजी सैनीकांच्या वतीने शेख अजिमोद्दीन ईनामदार मेजर यांनी आभार मानले.

## बहुजन विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष रमेश तात्या गालफाडे यांची स्वामी समर्थ वृद्धाश्रमास सदिच्छा भेट



केज ।सचिन भालेराव बहुजन विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष रमेश तात्या गालफाडे यांनी स्वामी समर्थ वृद्धाश्रम बोबडेवाडी रोड केज येथे सदिच्छा भेट देऊन स्वामी समर्थ वृद्धाश्रमामध्ये जाऊन वृद्धाश्रमास भेट देऊन आजी,आजोबा बरोबर गप्पा मारल्या व त्यांच्या राहण्याची,खाण्या पिण्याची सोय वगैरे विचारून त्यांना चौकशी केली.स्वतः आश्रमामध्ये फिरूनत्यांनी सर्व सोयी सुविधाची पाहणी केली व आश्रमातील सोयी सुविधा बद्दल त्यांनी स्वामी समर्थ वृद्धाश्रमाचे कौतुक केले.रमेश तात्या गालफाडे यांनी वृद्धाश्रमाला भेट दिल्याबद्दल त्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड,पत्रकार सनी शेख,अ?ड.निखिल बचुटे,सुग्रीव जोगदंड,बापू जोगदंड इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते. दरम्यान वृद्धाश्रमाला भेट दिल्यानंतर त्यांनी वेळोवेळी सहकार्यकरणार असल्याचे सांगितले आहे.

## कावड यात्रेमध्ये हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा.. शिवभक्त साईनाथ अक्कमवाड

**नायगाव ! हनुमान चंदनकर**

नायगाव तालुक्यातील नरसी शहरातील श्री क्षेत्र सिद्धेश्वर मंदिर ते श्रीक्षेत्र नरसिंह मंदिर राहेर येथील पवित्र गंगाजल घेऊन कावड यात्रा दिनांक १७ ऑगस्ट पहाटे चार वाजता कावड यातील सुरुवात होणार आहे ७१ वर्षानंतर प्रथमच श्रावण महिन्याची सुरुवात ही सोमवारने झाल्याने या पावन व पवित्र काळात शिव पूजा शिव जलाभिषेक अन्नदान पदयात्रा कावड यात्रा पूजा अभिषेक आरती आदी भक्ती मार्ग करून आपल्या जीवनाचे कल्याण करून घेण्यासाठी केल्या दोन वर्षापासून कावड यात्रेचा आयोजन करण्यात आला आहे मध्य प्रदेश प्रमाण मध्य प्रदेश प्रमाणे आपलेही येते गोदावरी नदीचा जलाभिषेक शंभू महादेवाला घालण्यासाठी कावड यात्रेच्या आयोजन करण्यात आला आहे या कावड यातील परिसरातील हजारो शिवभक्त शिव स्तुती व महाकाल चंदन लेप व कावड घेऊन यात्रे सहभागी होणार आहेत आपणही आपले लाख मोलाचे कामे बाजूला सारून या बहुमूल्य पर्व काळाचा लाभ घ्यावा व आपली जीवन कृतार्थ करावे असे आव्हान शिवभक्त साईनाथ अक्कमवाड नरसीकर यांनी केले आहे व आवड यात्रेत सहभागी होण्यासाठी ५० रुपये पूर्व फी भरून आपले नाव नोंदणी करावी असे आव्हान शिवभक्त साईनाथ अक्कमवाड यांनी केले आहे

# नशा मुक्ती भारत अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम उत्साह संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

मादक पदार्थाच्या गैरवापरास प्रतिबंध करण्यासाठी व भारताला अमली पदार्थ मुक्त बनवण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालया मार्फत नशामुक्ती भारत अभियान पाचव्या वर्षात पदार्पण करत आहे याच अनुषंगाने दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी सर्व शाळा महाविद्यालयाने सार्वजनिक संस्थांना समाविष्ट करून अमली पदार्थ विरुद्ध प्रतिज्ञा घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्याच अनुषंगाने जिल्हा समाज



कल्याण विभाग जिल्हा परिषद बीड, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई व राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृती विद्यालय बीड या ठिकाणी नशा मुक्त भारत अभियानांतर्गत प्रत्येक जण नशा मुक्त राहील याकरिता प्रतिज्ञा घेण्यात आली यावेळी रवींद्र शिंदे जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद बीड, डॉ. दत्ता नलावडे संस्कृती विद्यालय बीड तत्त्वशील कांबळे सामाजिक कार्यकर्ते आदींची प्रमुख उपस्थिती होती यावेळी तीनशे युवा व विद्यार्थी यांना नशा मुक्ती अभियानांतर्गत प्रतिज्ञा घेण्यात आली आली हे अभियान दिनांक १० ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे या अभियानामध्ये सांस्कृतिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा ,परिसंवाद, व्याख्यानमाला ,कार्यशाळा, व्यसनाधीनतेच्या विरोधात मानवी साखळी बनवणे, विद्यार्थ्यांची रॅली काढणे ,नाटक ,पथनाट्य, मॅरेथॉन ,पदयात्रा ,वृक्षारोपण इत्यादी विविध उपक्रम राबवण्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

# जुनी पेन्शन योजनेच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर पेन्शन क्रांती मुंडण मोर्चा

## १७ ऑगस्टला मोठ्या संख्येने सहभागी व्हा

**गेवराई।प्रतिनिधी**

१ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना तत्कालीन शासनाने १९८२-८४ ची जुनी पेन्शन योजना रद्द करून नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे. ही योजना राबवताना कसल्याही प्रकारचे नियोजन न करता घाईगडबडीत शासनाने हा निर्णय घेवून कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय केले आहे. आज या योजनेला १८ पूर्ण वर्षे झाली,पण म्हणावी तशी अंमलबजावणी झाली नाही. कपातीवर आधारित असलेल्या या योजनेत एनपीएस धारकांना मात्र कसलाही शसनवाटा लाभ मिळत नाही. शासनाची व्याजाची रक्कम जमा होत नाही,तर आजवर कपात झालेल्या रकमेचाही हिशोब मिळत नाही. एकंदरीत ही नवीन पेन्शन योजना कसलाही फायदा नसलेली आहे. कर्मचाऱ्यांना कसल्याही प्रकारची सुरक्षितता नसलेली ही पेन्शन योजना आहे. शासनाच्या हस्तक असलेल्या काही संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन जीपीएस नावाची नवीन योजना पुन्हा एकदा कर्मचाऱ्यांच्या माथी मारण्याचा घाट शासन करीत आहे. नागपूर येथे झालेल्या महाआक्रोश मोर्चा नंतर महाराष्ट्र शासनाने येणाऱ्या अधिवेशनात सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करू असे आश्वासित केले होते. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने एक सुकाणू समितीची निर्मिती करून लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते, मात्र येथे सुद्धा महाराष्ट्र शासनाने चलाखी करून जुन्या पेन्शनच्या नावाखाली कर्मचाऱ्यांच्या तोंडी पाने पुसली आहेत.समितीच्या शिफारशीनुसार GPS नावाची नविन पेन्शन योजना या समितीने प्रास्तावित केली आहे. सदर योजनेचे स्वरुप NPS योजनेसारखेच फसवे असल्याचे प्रथम दर्शनी लक्षात येत असल्याने राज्यातील सर्व DCPS/NPS धारक याचा तीव्र निषेध करीत आहेत. जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्याचा निर्णय न घेता शासन वारंवार DCPS, NPS आणि आता GPS सारख्या फसव्या योजना सबंधित कर्मचाऱ्यांना विचारात न घेता त्यांच्यावर लादत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये शासन धोरणाविषयी प्रचंड रोष निर्माण झाला आहे. राज्यात जुनी पेन्शन योजना बंद करुन अठरा वर्षाहून अधिक कालखंड झाला असून आता अनेक कर्मचारी सेवानिवृत झाले आहेत तरी काही सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. अश्यावेळी शासनाची DCPS आणि NPS योजना पेन्शन विषयक लाभ देण्यासाठी पुर्णतः अपयशी झाली आहे. त्यातुन या नविन GPS योजनेवर कर्मचारी विश्वास ठेवण्यास तयार नाहीत. छत्तीसगड ,मध्य प्रदेश राजस्थान, कर्नाटक,तेलंगणा आंध्र प्रदेश यासारख्या आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या राज्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू केली मग आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि पुरोगामी असलेल्या महाराष्ट्राला हे का परवडत नाही असा अहवाल कर्मचाऱ्यांमधून होत आहे. महाराष्ट्रातील १ नोव्हे. २००५ व त्यानंतर नियुक्त कर्मचारी व अधिकारी यांची एकमेव मागणी ही सरसकट जुनी पेन्शन योजना अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) १९८४ तसेच भविष्य निर्वाह निधी (GPF) सह लागू करणे ही आहे. कर्मचाऱ्यांना सरकारची प्रस्तावित सुधारीत निवृत्तिवेतन योजना / आश्वासित पेन्शन योजना (GPS) मान्य नाही. राज्यात जुन्या पेन्शन ऐवजी GPS किंवा अन्य कोणतीही योजना आणणे किंवा लागू करणे हे कर्मचाऱ्याचे सेवानिवृत्तीनंतर भविष्य उध्वस्त करणे होईल. त्यातुन कर्मचाऱ्यामध्ये शासन धोरणाविषयी रोष वाढत जाणार आहे. जीपीएस नावाच्या फसव्या योजनेचा फटका राज्यातील 24 लाख कर्मचाऱ्यांना बसणार आहे. यामुळे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने 'जो देईल पेन्शन त्यालाच निवडणुकीत समर्थन' वोट फॉर ओपीएस नावाची मोहीम राबवलेली आहे. या माध्यमातून राज्यातील कर्मचाऱ्यांचा आक्रोश व्यक्त होणार आहे. त्यामुळे शासनाला जागे करण्यासाठी तसेच DCPS, NPS आणि आता GPS सारख्या फसव्या योजना कर्मचाऱ्यांवर न लादता, राज्यातील सर्व कर्मचाऱ्याना म.ना.से.बि. १९८२-८४ अंतर्गत जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्याचा निर्णय घ्यावा. यासाठी राज्य भरातील लाखे कर्मचारी महाराष्ट्रात वेगवेगळी आंदोलने करत आहेत. म्हणूनच बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटना ,महसूल विभाग ,पंचायत विभाग ,जिल्हा परिषद ,आरोग्य विभाग ,कृषी विभाग ,आयटीआय, ट्रेझरी विभाग, पोलीस आस्थापना विभाग,आणि इतर सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी एकत्रित येऊन महाराष्ट्र शासनाच्या धोरणाच्या विरोधात पेन्शन क्रांती मुंडन मोर्चा काढत आहे. पेन्शन योजनेबाबत कर्मचाऱ्यांच्या मनात शासनविरोधात असलेल्या आक्रोश शासनापर्यंत पोहचण्यासाठी 17 ऑगस्ट 2024 वार शनिवार रोजी दुपारी 3.00 वाजता सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स चे जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे जुनी पेन्शन संघटनेचा जिल्हाव्यापी पेन्शन क्रांती मुंडण मोर्चाचे आयोजन केले आहे तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त डिसीपीएस व एनपीएस धारकांनी या महाआक्रोश मुंडण मोर्चाला उपस्थित राहुन मोर्चा यशस्वी करावा असे आवाहन राज्य उपाध्यक्ष संजय गंभीरे,राज्य प्रवक्ते शिवाजी खुडे, विभागीय संघटक नितीन माहूवाले जिल्हा अध्यक्ष विष्णू आडे, सर्जेराव चव्हाण अण्णासाहेब घोडके विशाल घोलप भूषण टेके जितेंद्र औताने,राहुल उंडाळे प्रशांत सुरवसे,लिंबाजी सोनपसारे ,हनुमान होके, कैलास गर्जे, गोविंद वायकर, महादेव नरवडे, महेश पघळ, दयावान कुठे, भीवराज कोकणे, ज्ञानेश्वर वाव्हाळ, निलेश चव्हाण, राहुल काक नाळे, अश्विनी गिरी, आशा धोंडे, संदीप धोंडे, अखिल मोमीन, सोनाजी बनकर, मुख्तार शेख, नितीन कर्डिले, सुनील वारे, राहुल डोंगर, अजय पवार, प्रकाश मुंडे, राहुल पोटभरे सर्व जिल्हा आणि तालुकाध्यक्ष जितेंद्र दहिफळे, रमेश रुद्रे, आनंद लाड, माणिक राठोड, अशोक भोजने, अमोल काळे, नारायण नरसाळे, विकास खेडकर , किशोर भालेराव,यांनी केले आहे.

# आष्टी विधानसभा मतदार संघामध्ये सर्वत्र नवीन चेहरा म्हणून एकच चर्चा या वेळेस सतिश आबा शिंदे भावी आमदार.

## सतीश शिंदे यांचा गाव भेट दौऱ्यामध्ये गावी गावी जोरदार स्वागत..

**आष्टी प्रतिनिधी :-**
आष्टी विधानसभा मतदारसंघाचे भावी आमदार सतीश शिंदे यांची आजपासून गाव भेट दौरा सुरू केला आहे, सुरुवात मांडवा गावाचे आराध्य दैवत श्री क्षेत्र मांडवेश्वर मंदिर या ठिकाणी महादेवाचा अभिषेक करून दर्शन घेतले, व दौऱ्याची सुरुवात केली. यावेळी, व एशियन गेम्स चॅम्पियन अविनाश साबळे त्यांच्या वडिलांचा यावेळी सत्कार करण्यात आला ,व उपस्थित मांडवा गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. व तसेच नंतर हजीपूर येथे अखंड हरिनाम सप्ताह येथे भेट दिली. व ह .भ. प विठ्ठल महाराज गहिनीनाथ गड यांचे दर्शन घेतले तसेच दर्शन करून बेलगांव,चिंचाळा,देसुर,शेकापुर,ब्रम्हगांव, करंजी,भाळवणी,पांगुळगव्हाण,कन्हेवाडी,कन्हेवडगांव,पोखरी,पांढरी , या गावांना भेटी दिल्या. तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या , गाव भेटी दरम्यान युवक आणि ज्येष्ठ नागरिकांचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत आहे. यावेळेस जनतेतून सतिश आबा पुढील आमदार पाहिजेत. अशा प्रतिक्रिया व गावातील नागरिकांची मागणी आहे. या दौऱ्यामध्ये आष्टी तालुक्यातील हनुमंत झगडे, शेख वाशिम, योगेश मुटकुळे ,अमोल दरेकर ,प्रवीण श्रीखंडे ,बंडू पवार, पठाण भाई , ज्ञानेश्वर पोकळे, अण्णा पोकळे, गणेश पोकळे, बाळासाहेब कापसे सरपंच, बाळासाहेब , हरिभाऊ गीते सरपंच , हरिभाऊ सांगळे, बाळासाहेब सांगळे उपसरपंच करेवाडी, रामभाऊ सांगळे, छायाताई गायकवाड सरपंच, कुमार गायकवाड, बंडू बांगर, पप्पू खांडवे, आबा खांडवे, आरडी सांगळे , ग्रामपंचायत सदस्य संजय सांगळे, जयदत्त सांगळे, राजेंद्र पुरी पप्पू नरोडे ,राहुल पोकळे ,पंडित अण्णा पोकळे, गहीनाथ गडे पाटील, नाजिम शेख, बाळासाहेब जगताप ,अविनाश पोकळे ,दिगंबर नाना पोकळे, रमेश दादा वांढरे, सचिन नरोडे बाळासाहेब पोकळे, शरद आजबे, बाळासाहेब जगताप



संदीप जगदाळे. आदि मान्यवर होते.

# देवमूर्ती शिवारातील राहत्या घरावर भरदुपारी धाडसी दरोडा, साडे चार लाखाचा मुद्देमाल लंपास

## दोन संशयितांना पोलिसांनी मुद्देमालासह घेतले ताब्यात

**जालना । असलम कुरेशी**
जालना तालुक्यातील देवमूर्ती शिवारातील राहत्या घरावर वृध्द दाम्पत्यास लोखंडी रॉडचा धाक दाखवून दरोडा टाकण्यात आला असून या दरोड्यात तब्बल साडे चार लाखाचा लंपास करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. यासंदर्भात प्राप्त माहितीनुसार जालना शहरापासून जवळच असलेल्या देवमूर्ती शिवारातील सर्वे नं. १६५ मध्ये शेतातील घरात विठ्ठल तुकाराम चव्हाण हे त्यांच्या पत्नीसह राहतात. रविवारी, ११ ऑगस्ट रोजी




दुपारी २.३० वाजेच्या सुमारास चव्हाण दाम्पत्य हे आपल्या घरात टीव्ही पाहत बसलेले होते. तेवढ्यात दोन दरोडेखोर हातात लोखंडी टॉमी घेऊन अचानक घरात घुसले. त्यांनी चव्हाण दाम्पत्याच्या खांद्यावर लोखंडी टॉमी ठेवून जीवे मारण्याची धमकी देत, त्यांच्याकडून लोखंडी कपाटाच्या चाव्या घेतल्या. कपाटातील रोख रक्कम १ लाख २५ हजार रुपये आणि २ लाख ७२ हजार रुपयाचे सोन्याचे दागिने दरोडेखोरांनी चोरून घेऊन पळ काढला. दरम्यान घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह पोलिसांच्या फौजफाट्याने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव आणि तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांच्या पथकाने दरोडेखोरांच्या शोधासाठी तात्काळ पथके तयार करून रवाना केली. दरम्यान, रात्री उशिरा पोलिसांनी दोन संशयितांना गुन्ह्यातील काही मुद्देमालासह ताब्यात घेतल्याची माहिती समजली आहे.

## सावित्रीबाई कोरडे यांचे दु:खद निधन



बीड । प्रतिनिधी
मोची पिंपळगाव येथील रहिवासी सावित्रीबाई गीनाजी कोरडे वय ९० वर्ष वृद्धापकाळाने यांचे दु:खद निधन दिनांक ११ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळच्या वेळी झाले.त्यांच्या पश्चात ४ मुले ३ मुली सुना, नातवंड, असा भरगच्च मोठा परिवार आहे. अंत्यविधी मोची पिंपळगाव येथील सार्वजनिक समशान भूमी येथे सकाळी ११ वाजता संपन्न झाला, यावेळी प्रतिष्ठित नागरिक, गावकरी, आप्तस्वकीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोरडे कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

### शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती समितीवर भाई राजु शेख यांची नवीन नियुक्ती आणि अॅड.भाई राजेंद्र नवले यांची फेरनिवड

## शेतकरी कामगारपक्षाच्या मध्यवर्ती समितीवर युवकांना संधी

**बीड (प्रतिनिधी)**-भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे 19 वे अधिवेशन पंढरपुर येथे भाई गणपतराव देशमुख नगरीमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.या अधिवेशनामध्ये शेतकरी, कामगार, कष्टकरी, दिन-दलीत यांच्या प्रश्नावर सातत्याने विद्यार्थीदशेपासून आंदोलन करणारे व चळवळीत सहभागी असणारे निष्ठावंत कार्यकर्ते भाई राजु शेख आणि अॅड.राजेंद्र नवले यांची मध्यवर्ती समितीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली. याबाबत वृत्त असे की शेकाप पक्षाचे अधिवेशन यापर्षी पंढरपुर येथे संपन्न झाले यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्राच्या मध्यवर्ती समितीवर भाई राजु शेख आणि अॅड.राजेंद्र नवले निवड झाली. भाई राजु शेख आणि अॅड.राजेंद्र नवले आजतागायत लाल बावट्याच्या झेंड्याखाली आजतागायत एकनिष्ठतेने



काम केले आहे भाई राजु शेख आणि अॅड.राजेंद्र नवले म्हणून त्यांची फेरनिवड झाली आहे. सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून त्यांनी काम केले आहे. भाई राजु शेख यांची नवीन नियुक्ती करण्यात आली आहे व अॅड. भाई राजेंद्र नवले यांची फेरनिवड करण्यात आली आहे त्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालयात नशा मुक्त अभियान

**बीड । प्रतिनिधी**
बीड येथे नशा मुक्त भारत अभियानांतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्री.तत्त्वशील कांबळे यांच्या माध्यमातून, बीड जिल्हा परिषद समाज कल्याण चे अधिकारी श्री शिंदे साहेब यांनी शाळेला भेट दिली, तसेच संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष श्री डॉ.दत्ताजी नलावडे सर, यांनी नशा मुक्त भारत अभियांतर्गत कार्यक्रमांमध्ये, संस्कृती विद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना नशा मुक्तीची शपथ दिली. तसेच श्री डॉ.दत्ताजी नलावडे सर



यांनी समाज कल्याण अधिकारी श्री. शिंदे साहेब यांना सर्व परिसर दाखवला, तसेच शाळेतील विविध उपक्रम त्यामध्ये पंचसूत्रे ,सप्तपदी तसेच विद्यार्थ्यांना शिकवण्यात आलेले, नवरस आणि सप्तरंग याबद्दल ही माहिती दिली यावरती अभिप्राय म्हणून श्री शिंदे साहेब यांनी शाळेचे खूप कौतुक केले व तुमची शाळा एक दिवस नक्कीच विशेष प्राविण्य मिळवेळ अशा शुभेच्छा दिल्या.

# बीड जिल्हा परिषदेच्या उघड्यावरील ९८ शाळांच्या इमारत निधीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रतिकात्मक शाळा भरवली

## बीड जिल्ह्यातील खालील तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ शाळा ईमारत विना

आष्टी तालुक्यातील जि.प.प.प्रा.शा.खेडकर गोठे बीड तालुक्यातील २८ (गवळवस्ती खापर पांगरी, आसराई वस्ती नाळवंडी, पवार वस्ती काळेगाव,खांडे वस्ती म्हाळसजवळा,मस्कर वस्ती सुर्याची वाडी,खोले वस्ती आहेर धानोरा,कोटुळे वस्ती वरवटी, घुमरे वस्ती वरवटी, आगम वस्ती पिंपरगव्हाण,बारकुल वस्ती गौळवाडी, खांडेकर वस्ती पाली, इस्मालेदरा वस्ती पाली, जगताप वस्ती कर्झणी,गौळी वस्ती पालदरा,बोरबन वस्ती पिंपळवाडी,तांबारे वस्ती साक्षाळपिंप्री,हिंगे वस्ती साक्षाळपिंप्री,नरनाळे वस्ती इट,माने वस्ती लिंबा,बेलगाव वस्ती बेलगाव, विठ्ठलवाडी नागझरी, मुंडे वस्ती ताडसोन्ना,क्रांती वस्ती ताडसोन्ना, जाधववस्ती वांगी, महादेव दरा तांडा मैंदा, मुंडे वस्ती बोरदेवी, सानप वस्ती रूद्रापुर

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मतदार संघात १८ जिल्हा परिषद शाळा ईमारती विना

महाराष्ट्र राज्य कृषी मंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांच्या मतदारसंघातील परळी तालुक्यातील ( सारडाव वस्ती,डाव वस्ती धर्मापरी, मणियार धर्मापरी, महादेव वस्ती, जांभुळ दरा तांडा, शिवाजीनगर सिरसाळा,विट भट्टी सिरसाळा,रायणारसिरसाळा,नेहरूनगरसिरसाळा,राधानगरसिरसाळा,हेमानाईकतांडा,महोदरातांडा) एकुण१२ आणि अंबेजोगाई तालुक्यातील (चनई तांडा,बरड वस्ती, लोखंडी सावरगाव विट भट्टी परीसर दवाखाना,भीमाई वस्ती,उघडे वस्ती) एकुण ६ शाळा अशा एकुण १८ जिल्हा परिषदेच्या शाळा १० वर्षांपेक्षा जास्त कालावधीहुन ईमारत विरहीत असुन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी तातडीने ईमारत बांधकामासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून मंजुरी द्यावी.




बीड:- बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ वस्तीशाळा इमारत विरहित असुन ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी पायाभूत सुविधांचा अभाव असुन गेल्या १० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून उघड्यावर झाडाखाली, पत्र्याच्या शेडमध्ये, समाज मंदिरात अथवा किरायाच्या एका रुममध्ये भरत आहेत त्यामुळे ईमारत बांधकामासाठी जिल्हा वार्षिक योजना (वार्षिक) सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील शाळांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे या लेखाशिर्षाखाली तातडीने निधी मंजूर करून देऊन ईमारत बांधकाम करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी आज दि.१२ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रतिकात्मक शाळा भरवुन जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी "उघड्यावरची शाळा" आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, शेख मुबीं, मुस्ताक शेख,शिवशर्मा शेलार , आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष अशोक येडे आदि सहभागी झाले होते.जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना निवेदन देण्यात आले. धारूर तालुक्यातील ३ (आनंद नगर,संचगाणी तांडा,खोडस तांडा) केज तालुक्यातील १७ ( यमाई वस्ती,चिंचकर वस्ती,डांगे वस्ती, विठ्ठल वस्ती,येडका वस्ती,गदळे वस्ती, हनुमान वस्ती, हनुमान वस्ती तुकाचीवाडी, गजानन नगर, विठ्ठल नगर वस्ती, भालगाव नं १ ऊर्दू, चिंचोली माळी ऊर्दू, मेटे वस्ती,घाटे वस्ती,सोनदरा वस्ती,हरगड वस्ती,लहुरी ऊर्दू गेवराई तालुक्यातील ११ ( मोरे वस्ती राजपिंपरी, शेंबडे वस्ती शेकटा, गदाडे वस्ती शेकटा, हनुमान नगर धुमेगाव,नालसाहेब वस्ती नंदपुर, काटकर वस्ती कुंभार वाडी, लक्ष्मण वस्ती खडकी, शिंदे वस्ती खडकी, धनगर वस्ती गाडेवाडी,अंकोटा ,देवीतांडा तलवडा, पाटोदा तालुक्यातील ३ (भांगे वस्ती,टोकवाड वस्ती,तांबे वस्ती) शिरूर तालुक्यातील ५ ( महात्मा फुले नगर, विठ्ठल वस्ती, शिंदे वस्ती झापेवाडी,पांढरे वस्ती शिंगारवाडी, रूताळे वस्ती वडवणी तालुक्यातील १ वंजारवाडी वस्ती माजलगाव तालुक्यातील ११ ( हनुमान नगर तांडा, राठोड वस्ती,येला तांडा, इंदिरा नगर राजेगाव, अहिल्या नगर, माऊली वसाहत, झोपडपट्टी वारोळा,नाईक नगर, झुंझुर्डी तांडा,नागडगाव तांडा, हनुमान नगर टाकरवण आदि शाळा ईमारत विरहीत असुन त्यांना निधी देण्याची मागणी करण्यात आली.

# बालरोग तज्ञ डॉ. दिनकर राऊत यांनी १० दिवसांच्या बाळाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया केली यशस्वी

## योगीता बालरुग्णालयात बाळाला मिळाले जीवदान

**केज । सचिन भालेराव**

केज तालूक्यातील कानाडीमाळीचे रहिवाशी डॉ. दिनकर राऊत यांनी बालरोग तज्ञ या पदावर काही दिवस शासकीय रुग्णालयात काम केले व नंतर २००५ ला केज शहरात योगीता बाल रुग्णालय चालू केले तंस पहिल तर हे रुग्णालय बीड जिल्ह्यातील पहिले एन ए बी एच चे नामांकित बाल रुग्णालय आहे पुणे मुंबई प्रमाणे या रुग्णालयात अनेक प्रकारांच्या सुविधा उपलब्ध आहेत. मराठवाड्यात फार मोठ्या प्रमाणात बाल रुग्णालय आहेत त्या पैकी केज सारख्या ग्रामीण भागात केज येथील योगिता बाल रुग्णालय हे लहान बालकांसाठी एक वरदानच ठरले आहे सद्य परिस्थितीत औरगांबाद, लातूर, नांदेड या ठिकाणी सर्व सोयी युक्त बाल रुग्णालय आहेत पण या ठिकाणी सुद्धा सहाशे ग्राम च्या बाळाला जीवदान देणे शक्य झाले नाही ते योगिता बाल रुग्णालय केज या ठिकाणी शक्य झाले त्यामुळे योगीता बाल रुग्णालयाचे नाव हे मराठवाडयातील एकमेव सहाशे ग्रामच्या बाळाला जीवनदान देणारे डॉ दिनकर राऊत यांचे रुग्णालय म्हणून सर्वदुर परिचीत झाले योगीता बालरुग्णालयात आत्ता पर्यत ५० च्या वर गुतांगुतीच्या शस्त्रक्रिया व जवळ पाचशेच्या वर सहाशे ते सातशे ग्राम वजनाच्या बाळाला जीवदान दिले आहे व दिनकर राऊत हे कितीही किचकट शस्त्रक्रिया असो आवाहन स्विकारने हे त्यांच्या नसानसांत रुजले आहे.

अशीच एक गुंतागुतीची शस्त्रक्रिया याच दवाखान्यात पार पडली केज तालुक्यातील युसुफवडगाव येथील रहिवाशी सौ. दिपाली संदीप कदम यांना प्रस्तुती साठी स्वामीरामांनद तीर्थ अंबाजोगाई रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांनी एका बाळाला जन्म दिल्यानंतर बाळ





हिरवटकलरची उलटी करू लागले बाळाचे वजन २ किलो होते .पालकांनी सात दिवस अंबाजोगाई येथे बाळावर उपचार केले व नंतर कळंब येथे तीन दिवस उपचार केले पण यश काही आले नाही .शेवटी ते डॉ. दिनकर राऊत यांचे योगिता बाल रुगणालय केज या ठिकाणी आले व सर्व तपासणी अंती निदान झाले व डॉ दिनकर राऊत यांनी बाळावर शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला पालकांना दिला व डॉ .दिनकर राऊत यांचा अनुभव पाहाता पालकांनी तात्काळ होकार दर्शवला आणि शस्त्रक्रिया करण्याचे ठरले. संदीप कदम व दिपाली कदम यांच्या बाळाला जन्मजातच लहान आतडे व मोठे आतडे हे विरुध्द दिशेने होते व आतड्याला पीळ पडला होता पीळ पडल्याने रक्त पुरवठा कमी प्रमाणात होतो त्यामुळे वेळेत उपचार होणे गरजेचे होते नसता आताडे सडण्याचा प्रकार होऊन प्रसंगी मृत्यू सुद्धा होऊ शकतो तात्काळ डॉ दिनकर राऊत यांनी डॉ रामदास नागरगोजे जे लहान मुलांचे पोट विकार तज्ञ आहेत त्यांना व डॉ सुळे भुलतज्ञ स्वत डॉ दिनकर राऊत व त्यांची टीम यांनी दोन तास शस्त्रक्रिया करून बाळाला जीवनदान दिले शस्त्रक्रिया नंतर ३ दिवस बाळ कृत्रिम श्वासोश्वासावर होते व १७ दिवस अतिदक्षता विभागात डॉक्टरांनी देखभाल करुन बाळाला ठणठणीत बरे करून आई वडीलांच्या स्वाधीन केले एवढया गुंतागुतीची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करून डॉ रामदास नागरगोजे ,डॉ दिनकर राऊत , डॉ सुळे यांनी बाळाला जीवदान दिले त्याबदल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. संदीप कदम व दिपाली कदम यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की डॉ रामदास नागरगोजे , डॉ दिनकर राऊत , डॉ सुळे हे आमच्या साठी देवदुत बनुन आले .नवजात शिशू चे सर्व प्रकारचे उपचार केज सारख्या ठिकाणी अल्प दरात होत असताना गरजू रुग्णाना मोठया शहरात भरमसाठ पौसा खर्च करण्याची गरज नाही असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

# खरीप मधील कापुस, सोयाबीन उत्पादक शेतक-यांना मिळणार अर्थसहाय्य

नांदेड प्रतिनिधी :नांदेड : (ता.१२-ऑगस्ट ) राज्यातील ज्या कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक ॲप, पोर्टलद्वारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे, असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसहाय्याकरीता पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना ०.२० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट रुपये 1 हजार तर ०.२० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर रुपये ५ हजार (२ हेक्टरच्या मर्यादित) अर्थ सहाय्य देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गावचे कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयास संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी जिल्ह्यातील शेतकरी बांधवाना केले आहे.

# तालुकास्तरीय राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सवात साने गुरूजी निवासी विद्यालय प्रथम

**केज।सचिन भालेराव**

राष्ट्रीय संग्रहालय परिषद, भारत सरकार, नेहरू विज्ञान केंद्र, वरळी व शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नाट्योत्सवात केज तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सवाचे आयोजन १० आगस्ट २४ रोजी येथील गट साधन केंद्र या ठिकाणी केले होते. तालुक्यातुन विविध शाळांच्या संघानी यात सहभाग नोंदवला होता. यात साने गुरुजी निवासी विद्यालय, केजने प्रथम क्रमांक पटकावून केज तालुक्याचे नेतृत्व जिल्हा पातळीवर




करणार आहे. यात आरोग्य आणि स्वच्छता या विषयावर कु. साक्षी कराड लिखित व दिग्दर्शित नाटक सादर करुन उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली यात कु. वृषाली चौरे, कु.मैंद पुनम, कु.हातागडे जान्हवी, चि.तिडके ओमकार, चि. फड निवृत्तीनाथ, चि. कांबळे तेजस, चि.खोसे शिवराज, चि.चौरे अभिषेक या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तर विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कविता गित्ते/कराड मॅंडम यांच्या मार्गदर्शनाखाली श्रुती लहाने, डॉ. नागरगोजे मनिषा, कपील दस्तुरे, भांगे सचिन, इत्यादी शिक्षकांनी परिश्रम घेतले.या स्पर्धेच्या माध्यमातून मनोरंजनातून विद्यार्थी, शिक्षक व जनसामान्य यांना वैज्ञानिक माहिती घटना आणि संकल्पना रुजवता यावी हा हेतू शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांचा आहे.

# घरी प्रसुतीदरम्यान अतिरक्तस्त्राव प्रकृती खालावल्याने गंगापूरला नेताना ट्रॅक्टर दोनदा चिखलात फसला

## रुग्णालयात नेईपर्यंत गेला २५ वर्षीय विवाहितेचा जीव

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील पखोरा येथे स्वाती प्रमोद पदार (वय २५. रा. पखोरा. ता. गंगापूर) या विवाहितेचा प्रसूतीदरम्यान अति रक्तस्त्राव झाल्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. प्रवासी वाहन उपलब्ध न झाल्याने स्वातीला गंगापूरला ट्रॅक्टरमधून न्यावे लागले होते. हा ट्रॅक्टर खराब रस्त्यामुळे दोन ठिकाणी



चिखलात फसला. त्यामुळेगंगापूरकडे जाण्यास विलंब झाला. ट्रॅक्टर फसला नसता तर तिला रुग्णालयात वेळेवर नेता आले असते. खराब रस्त्यामुळे स्वातीचा बळी गेल्याचा आरोप तिच्या नातेवाइकांनी केला आहे.स्वातीने बाळाला जन्म दिला असून. पुरुष जातीचे बाळ सुखरूप असल्याची माहिती नातेवाइकांनी दिली. रविवारी सकाळी सातच्या सुमारास स्वातीला अचानक प्रसूतीवेदना सुरु झाल्या. घरातील महिलांनी स्वातीची प्रसूती केली. तिने पुरुष जातीच्या बाळाला जन्म दिला. मात्र प्रसूती दरम्यान अतिरक्तस्त्राव झाल्याने तिची प्रकृती खालावली. त्यामुळे तिला गंगाए येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तिथे वैद्यकीयअधिकाऱ्यांनी तपासून तिला मृत घोषित केले. स्वाती यांच्या पश्चात पती. एक मुलगी. दोन मुले असा परिवार आहे. उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह रविवारी दुपारी नातेवाइकांच्या स्वाधीन करण्यात आला.

# महादेव भोसले यांना मातृशोक द्रोपदी भोसले यांचे दु:खद निधन



बीड । प्रतिनिधी बीड येथील रहिवासी महादेव सुदाम भोसले यांच्या मातोश्री द्रोपदी सुदाम भोसले यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११ ऑगस्ट २०२४ रोजी दुःखद निधन झाले आहे. त्यांचे मृत्यू समय वय ७५ वर्षे होते. त्यांना पश्चात तीन मुले, मुलगी सुना नातवंडे असा वर्ग परिवार मोठा आहे, त्या मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या, धार्मिक कार्य सक्रिय सहभाग होता, भोसले कुटुंबीय अनेक वर्षांपासून सामाजिक राजकीय आणि कामांमध्ये सक्रिय असून त्यांच्या जनसामान्यांमध्ये मोठा संपर्क होता.अंत्यविधी संत भगवान बाबा मंदिर परिसरातील स्मशानभूमीमध्ये रात्री पार पडला. वेळी विविध राजकीय पक्षाचे नेते, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनीयर, शिक्षक, वकील, पत्रकार व त्यांना मानणारा मोठा परिवार मोठा उपस्थित होते. भोसले कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

# श्रद्धासंपन्न व्यक्ती, सर्वात श्रीमंत व्यक्ती – भदंत धम्मशिल थेरो

**माजलगाव । प्रतिनिधी**

आपल्या अंतर्मनात त्रिरत्ना प्रती दृढनिष्ठेने प्रविष्ट होण्यासाठी श्रद्धा हा सद्गुण अंगी बाणवणे गरजेचे आहे. खऱ्या श्रद्धेमुळे माणूस माणसाशी जोडला जातो. धम्मामध्ये खरीखुरी विकसित झालेली श्रद्धा ही माणसाला ताकद ,बल आणि ऊर्जा देते. पण श्रद्धा ही अंतर्मनातील आहे की वरवरची आहे हे देखील समजून घेणे गरजेचे आहे.खऱ्याखुऱ्या श्रद्धेच्या नौकेतून भवसागर पार करता येतो व सुखाचे तीरावर पोहोचता येते अशी श्रद्धा ही खरे माणसाचे वैभव आहे. श्रद्धेच्या इंद्रियाने धम्म समजून घेतला तर, श्रद्धेमुळे माणसाची लूट होत नाही, म्हणून श्रद्धासंपन्न व्यक्ती हा सर्वात श्रीमंत व्यक्ती असतो. या करिता धम्माचे अंतकरणपूर्वक चिंतन करत आपल्यातील श्रद्धाबीज ओळखणे आणि ते फुळवणे हे धम्म जीवनातील पहिले पाऊल आहे.असे प्रतीपादन पूजनीय भदंत धम्मशील थेरो यांनी केसापुरी कॅम्प येथील श्रावस्ती बुद्ध विहार येथे रविवारी तारीख ११ ऑगस्ट २०२४ रोजी साप्ताहिक बुद्ध वंदना निमित्ताने धम्मदेशनेत केले. तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त असलेल्या श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी कॅम्प येथे दर रविवारी धम्मदेसना आयोजित करण्यात येते.



या वेळी पूज्य भदंत धम्मशील थेरो हे " उपासकाचे चार सदगुण " या विषयावर बोलत होते. त्यापैकी आज श्रद्धा सद्गगुण विषयी सुमारे दीड तास सुंदर परिणामकारक असे त्यांचे प्रवचन झाले. यावेळी साप्ताहिक पूजेचे यजमान तसेच अल्पोपहार सौजन्य संगीताताई दामोधर बागडे यांनी केले . प्रास्ताविक सद्धम्म सेवा संघाचे अध्यक्ष आयु सदाशिव भालेराव यांनी केले. तर सूत्रसंचालन ॲड. दशरथ मकसरे यांनी केले.तर आभार सचिव जी.एन घनघाव यांनी मानले.या वेळी सद् धम्म सेवा संघाचे पांडुरंग जाधव, एम.बी चांदमारे, सोपान उजगरे, एन.जी शिनगारे,रविकांत उघडे, अरुण नाकलगावकर, लीलाताई उजगरे ,वालाबाई टाकनखार, तसेच डॉ.श्रीराम खळगे, सुनील सौंदरमल,एल. आर.मस्के, दीपक भालेराव, भीमराव ढाकरगे ,लक्ष्मणराव सहजराव, बी जी रणदिवे,नवनाथ गायकवाड, प्रशांत सातपुते, जे.सी. चांदमारे, जालिंदर देशमाने, सूनिता घनघाव, मनीषा एकनाथ मस्के,पद्माकर रूचके, सुधामती पौळ, आशाताई शिरसट, राधाबाई उघडे, शीतल सातपुते, धनश्री सातपुते, राधाबाई फुलवरे,पूनमताई धाईजे,नालंदाताई भालेराव,विद्याताई निसर्गंध यांच्यासह तालुक्यांतील अनेक बौद्ध उपासक उपसिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077